पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक – पिन 422003, दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

# प्रेसनोट

दिनांक :-२६/०१/२०२२

## अवैधरित्या अग्निशस्त्रे बाळगणारेगुन्हेगार जेरबंद
## ०३ देशी बनावटीचे पिस्टल, ०१ एअरगन, ०१ चॉपर व ०६ जिवंत काडतुसे हस्तगत

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, तसेच अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन व्हावे यासाठी मा.पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांचे आदेशान्वये पोलीस ठाणे निहाय कारवाई सुरू आहे.

पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण श्री.सचिन पाटील यांना मिळालेल्या गुप्तबातमीची माहिती मा.पोलीस अधिक्षक यांनी पोलीस निरीक्षक / हेमंत पाटील, स्थानिक गुन्हे शाखा यांना सांगुन त्यांना कार्यवाही करणेबाबत सांगितल्याने पोलीस निरीक्षक श्री.हेमंत पाटील यांनी पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे मार्गदर्शन करून पोलीस पथकांनी दिनांक २६/०१/२०२२ रोजी बोरगाव ते सुरगाणा रस्त्यावर चीराई स्टॉप त्रिफुली येथे नागशिवडी गावचे शिवार परिसरात छापा टाकुन अवेधरित्या घातक अग्निशस्त्र बाळगणारे इसमांना ताब्यात घेतले. सदर कारवाईत इसम नामे १) अंकेश सुरेश एखंडे, वय-२९ वर्षे, रा-गोडंब, सुरगाणा २) श्यामराव नामदेव पवार, वय-२४ वर्षे, रा-वांजुरपाडा, सुरगाणा ३) आकाश सुनिल भगरे, वय-२२ वर्षे, रा-सुरगाणा यांचे कब्जातुन **०३ देशी बनावटीचे पिस्टल** (गावठी कट्टे) व **०३ जिवंत काडतुसे** तसेच **०१ एअर गण, ०१ चॉपर, ०१ कोयता, ०६ मोबाईल व ०१ टोयाटो कोरोला वाहन** असे घातक अग्निशस्त्र हस्तगत करण्यात आले. सदर इसमांविरूध्द अवैधरित्या घातक अग्निशस्त्र बाळगले प्रकरणी सुरगाणा पोलीस ठाणेस **भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५, ४/२५** प्रमाणे दाखल करण्यात आले असुन पोलीस पथक पुढील तपास करीत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे मा.पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे पोलीस अधिक्षक यांचे पोलीस पथकातील पोनि/हेमंत पाटील, सपोनि/रामेश्वर मोताळे, सहापोउपनि/नाना शिरोळे, पोहवा/गोरक्षनाथ सवंत्सकर, पोहवा/किशोर खराटे, पोहवा/प्रविण सानप, पोना/विश्वनाथ काकड यांनी सदरची कामगिरी केली आहे.